IMPACT FACTOR : 4.197 (IIJIF)

ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A Peer Reviewed Bimonthly International Journal

VOL. 4 | ISSUE 3 | MARCH-APRIL 2018

*Editor in Chief*

**Dr Kalyan Gangarde**

VOL. 4 | ISSUE 3| MARCH-APRIL 2018 (UGC Approved Journal No. 63716) Impact Factor: 4.197 (IIJIF)

**ISSN: 2454-5503**

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

**BOOK 2**

*Chief Editor:*

**Dr Kalyan Gangarde,**
Director, Centre for Humanities and Cultural Studies, Kalyan (W)

*Co- editors*

**Dr. Sadhana Agrawal,**
Asst. Professor, Maharani Laxmibai Govt. College of Excellence, Gwalior (M.P.) India

**Dr Grishma Khobragade,**
Asst. Prof., Birla College, Kalyan (W)

**Dr. Pandurang Barkale,**
Asst. Professor, Dept of English, SNDT Women's University, Churchgate, Mumbai

**Dr. Bharat Gugane,**
Asst. Professor, Bhosala Military College, Nashik, Maharashtra

**Dr. Dashrath Kamble,**
Asst. Professor, S.B.College, Shahapur, Dist. Thane, Maharashtra

*Mahatma Gandhi Education and Welfare Society's*

**CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES, KALYAN (W)**

*www.mgsociety.in +91 8329000732 Email: chcskalyan@gmail.com*

# Contents


1. An Analytical Study Of English Language Teaching Stratagems And Its Testing And Evaluation Strategies
**Dr. Jobi George** **6**

2. A Review On The Importance Of Proverbs In English Literature
**Dr. Vinita S Virgandham** **11**

3. Alienation In Rohinton Mistry's 'Squatter'
**Someshwar Wasekar & Dr. Anuradha D. Kherdekar** **17**

4. Exploring The Multifaceted Tapestry Of Indian Culture: Gita Mehta's 'A River Sutra'
**Dr. Raheel K. Quraishi** **21**

5. Human Rights Of Subjugated Populations: Prospects And Challenges
**Dr. Mangesh Kadu** **24**

6. Stress And Its Management
**Dr. Aditya Kishor Sarwe** **31**

7. IPR Awareness Model For Engineering College Faculties
**Rajasree O.P., Mangala A. Hirwade, Sunilkumar U.T.** **34**

8. 'मेक इन इंडिया' आत्मनिर्भर भारतासाठी समर्थ अभियान
**प्रा.डॉ. सुनिल शिंदे** **45**

9. अल्पसंख्याक समुदायांवर पोलिसांच्या वांशिक व्यक्तिचित्रणाच्या प्रभावाचा आणि मानवी हक्कांवर त्याच्या परिणामाचा अध्ययन
**प्रा. डॉ. मोतीराज रा.चव्हाण** **51**

10. प्रयोगात्म विधिनाट्यः गोंधळ
**डॉ. मधुकर वि. नंदनवार** **58**

11. बॅकिंग क्षेत्रातील माहिती तंत्रज्ञानाची उपयुक्तता
**डॉ. अनिता वि. महावादीवार** **63**

12. भारतीय कंपन्यांचे ई—कॉमर्स मध्ये वर्चस्व
**प्रा. डॉ. राजेश सं. बहूरुपी** **68**

**8.**

# ‘मेक इन इंडिया’ आत्मनिर्भर भारतासाठी समर्थ अभियान

**प्रा.डॉ. सुनिल शिंदे**
अर्थशास्त्र विभागप्रमुख, भिवापूर महाविद्यालय, भिवापूर जि. नागपूर

**प्रस्तावना**

भारतीय अर्थव्यवस्था ही फार पुरातन काळापासून कृषीक्षेत्रावर निर्भर होती. स्वातंत्रपूर्व काळात ब्रिटीश राजवटीमध्ये भारत हा कृषीप्रधान देश असूनसुध्दा भारताला विदेशातून अन्नधान्याच्या आयात करावी लागत होती. भारताच्या या स्थितीमध्ये स्वातंत्र्योत्तर काळातही फार बदल झाला नाही. स्वातंत्र्योत्तर काळात आणि आजही भारताची अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. १९५०-५१ मध्ये भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात कृषीचे योगदान ५० टक्कयांपेक्षाही अधिक होते. राष्ट्रीय उत्पन्नात उद्योग व सेवा क्षेत्राचा वाटा फारच कमी होता. उपजिविकेसाठी ७० टक्यांपेक्षाही जास्त लोकसंख्या कृषी क्षेत्रावर निर्भर होती.त्यामुळे कृषी विकासाला प्राधान्य देऊन अन्नधान्याच्या बाबतीत विदेशावरचे अवलंबित्व कमी करण्यासाठी भारताने पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये कृषीला प्राधान्य दिले. दुसरी पंचवार्षिक योजना ही पी.सी. महालनोबिस यांच्या विकास प्रारूपावर आधारीत होती यामध्ये औद्योगिक विकासाला प्राधान्य देण्यात आले. परंतु त्यानंतरच्या काळात भारताने स्विकारलेल्या धोरणामुळे भारताच्या आर्थिक विकासामध्ये औद्योगिक क्षेत्रातील उत्पादनाचा टक्का पाहिजे तसा वाढला नाही. स्वातंत्र्योत्तर काळातील भारताने स्विकारलेल्या धोरणामुळे अर्थव्यवस्थेचा आर्थिक विकास पाहिजे त्या वेगाने होऊ शकला नाही. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाला गती येण्यासाठी भारताने १९९१ मध्ये नविन आर्थिक धोरण स्विकारले. जागतिकीककरण, उदारीकरण आणि खाजगीकरण ही या नविन आर्थिक धोरणाची महत्वाची विशेषतः होती. या नविन आर्थिक सुधारणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल कृषिप्रधान अर्थव्यवस्था ते सेवाप्रधान अर्थव्यवस्था या दिशेने झाली. याचा परिणाम भारताच्या औद्योगिक विकासावर झाला. सद्यस्थितीत भारताच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नामध्ये ५७ टक्के योगदान सेवाक्षेत्राचे आहे. १८.२० टक्के योगदान कृषी क्षेत्राचे आहे तर औद्योगिक क्षेत्राचा वाटा केवळ १३. ८९ टक्के इतका आहे. त्यामुळे औद्योगिकरणाच्या बाबतीत भारताची पिछेहाट झाली. तरूणामध्ये बेरोजगारीचे प्रमाण वाढत जात होते. त्यामुळे रोजगार निर्मिर्ती, दारीद्र्य निमुर्लन आणि स्वदेशातील वस्तूचा वापर या दृष्टीने उत्पादन क्षेत्राला प्रोत्साहन दिल्या शिवाय भारतीय अर्थव्यवस्थेला बळ येणार नाही व भारत खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर होणार नाही ही बाब पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लक्षात घेऊन आत्मनिर्भर भारताची घोषणा केली. काही वर्षापुर्वी मेड इन जर्मनी, मेड इन जपान, मेड इन चाईना, मेड इन युएस अशा वस्तूंचा मार्केटमध्ये बोलबाला होता तसाच भारतीय वस्तूंचा असावा, भारतीय वस्तूंची जगात एक वेगळी ओळख निर्माण व्हावी यासाठी पंतप्रधान नरेद्र मोदी यांनी ‘मेक इन इंडियाचा’ नारा दिला. यासाठी त्यांनी अर्थव्यवस्थेत सकारात्मक बदल करून आत्मनिर्भर भारताच्या दिशेने एक महत्वाचे पाऊल टाकले.

## ➢ मेक इन इंडिया चा अर्थ

विदेशी गुंतवणूकीला आकर्षित करून, औद्योगिक विकासाला प्रोत्साहन देऊन, भारताला जगातले प्रमुख निर्मिती केंद्र बनवायच्या महत्वाकांक्षी अभियानाचे सरळरूप म्हणजेच मेक इन इंडिया होय. मेक इन इंडिया हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा महत्वाकांक्षी राष्ट्रीय कार्यक्रम असून अर्थव्यवस्थेतील गुंतवणूक वाढविण्यासाठी, नविन नविन कल्पना राबविणे, कुशल मनुष्यबळ निर्माण करणे, कौशल्य विकास, बौद्धिक संपत्तीचे संरक्षण

करणे आणि देशामध्ये मुलभूत उत्कृष्ट उत्पादनाच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी डिझाइन करण्यात आलेला आहे.

## ➢ मेक इन इंडियाचे उद्देश

मेक इन इंडिया ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २५ सप्टेंबर २०१४ रोजी नवी दिल्ली येथे सुरू केलेले महत्वाकांषी अभियान आहे. हे अभियान सुरू करण्याचा उद्देश भारतातला जागतिक उत्पादन केंद्र बनवण्याचा आहे. मेक इप इंडिया भारताच्या आर्थिक वाढीसाठी अतिशय महत्वाचे अभियान आहे त्याचा उद्देश भारतातील प्रतिभेचा वापर करून अतिरीक्त रोजगाराच्या संधी निर्माण करणे आणि दुय्यम आणि तृतीयक क्षेत्राचे सक्षमीकरण करणे आहे. या अभियानाच्या अंतर्गत जागतिक स्तरावरून मोठ्या प्रमाणात विदेशी गुंतवणूक देशामध्ये आकर्षीत करून भारताच्या उत्पादन क्षेत्राला मजबुती प्रदान करणे आहे. मेक इन इंडियाची काही प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहे.

१. सर्वसमावेशक विकासाला चालना देण्यासाठी शहरी गरीब आणि ग्रामीण स्थलांतरीतामध्ये आवश्यक कौशल्य विकसित करणे.
२. भारतीय उत्पादन क्षेत्राची जागतिक स्पर्धात्मक शक्तीमध्ये वाए करणे.
३. २०२२ पर्यंत उत्पादन क्षेत्रातील जीडीपीचा वाटा २५ टक्यांपर्यंत वाढविणे.
४. निर्माण क्षेत्रातील वार्षिक वृध्दी दर १२.१ वरून ४४ पर्यंत वाढविणे.
५. निर्माण क्षेत्रामध्ये अतिरीक्त रोजगाराच्या संधी निर्माण करणे.
६. भारताला जगभरात पंसतीचे उत्पादन केंद्र बनविणे.
७. २०२२ पर्यंत निर्माण क्षेत्रातील नोकऱ्यांची संख्या १०० दशलक्षने वाढविणे.
८. उत्पादन क्षेत्रात देशांतर्गत मूल्यवर्धन आणि तंत्रज्ञानाची खोली वाढविणे.

## ➢ मेक इन इंडियाचे प्राधान्यक्रम क्षेत्र

मेक इन इंडिया अभियानामध्ये भारत सरकारने प्राध्यान्याने निवड केलेल्या २५ क्षेत्रावर फोकस केलेला आहे.

| अ.क्र. | क्षेत्र | अ.क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| ०१ | ऑटोमोबाईल | १४ | खाणकाम |
| ०२ | ऑटोमोबाईल घटक | १५ | तेल आणि वायू |
| ०३ | विमानचालन | १६ | फार्मास्युटिकल्स |
| ०४ | जैवतंत्रज्ञान | १७ | बंदरे आणि शिपिंग |
| ०५ | रसायने | १८ | रेल्वे |
| ०६ | बांधकाम | १९ | अक्षय ऊर्जा |
| ०७ | संरक्षण उत्पादन | २० | रस्ते आणि महामार्ग |
| ०८ | इलेक्ट्रिकल मशिनरी | २१ | अंतराळ |
| ०९ | इलेक्ट्रानिक प्रणाली | २२ | कापड आणि वस्त्र, |
| १० | अन्न प्रक्रिया | २३ | औष्णिक ऊर्जा |
| ११ | आयटी आणि बीपीएम | २४ | पर्यटन आणि आदरातिथ्य |
| १२ | लेदर | २५ | आरोग्य |
| १३ | मीडिया आणि मनोरंजन | | |

१. ऑटोमोबाईल : ऑटोमोबाईल उद्योगात २०१० ते २०१४ या काळात प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक ५.३ अब्ज डॉलर होती त्यामध्ये २०१४ ते २०१८ या काळात गुंतवणूक ८.६ अब्ज डॉलरवर पोहचली. सध्या भारताच्या निर्यातीमध्ये ऑटोमोबाईल क्षेत्राचा वाटा ८ टक्कें असून भारताच्या जीडीपीच्या ७.१ टक्के आहे.

२. ऑटोमोबाईल घटक : या क्षेत्रातील उद्योगांनी २२.६ टक्के वाढ नोंदविली आहे २०१३ ते २०१५ मध्ये या क्षेत्राची ४.४६ लाख कोटी असलेली उलाढाल २०१५ ते २०१७ या दरम्यान ५.४७ लाख कोटीपर्यंत पोहचली आहे.

३. विमानचालन : हवाई वाहतुक क्षेत्रातील प्रत्यख विदेशी गुंतवणूकीमध्ये पाच पट वाढ झाली आहे. २०१० ते २०१४ या दरम्यान या क्षेत्रात २२६ दशलक्ष डॉलर असलेली विदेशी गुंतवणूक २०१४ ते २०१८ च्या दरम्यान ११४८ दशलक्ष डॉलरवर पोहचली आहे.

४. जैवतंत्रज्ञानः गेल्या आठ वर्षात भारताच्या जैव अर्थव्यवस्थेत आठ पटींनी वाढ झाली आहे. या क्षेत्रात १० अब्ज अमेरिकी डॉलर्स वरून ८० अब्ज डॉलर्स वृध्दीची नोंद केली आहे. आज जवळपास ६० विविध उद्योगांमधील ७० हजार स्टार्ट–अप नोंदणीकृत आहेत. ५ हजारांहून अधिक स्टार्ट–अप जैवतंत्रज्ञानाशी निगडीत आहेत.

५. रसायने : आसाम गॅस प्रकल्प कार्यान्वित करून या प्रकल्पातून दरवर्षी २.८ लाख मेट्रिक टन पॉलिमर उत्पादनाचा अंदाज आहे. या प्रकल्पाने १ लाख रोजगाराची निर्मिती केली आहे.

६. बांधकामः बांधकाम क्षेत्र हा कृषी क्षेत्रानंतर सर्वात जास्त रोजगार मिळऊन देणारा देशातील दुसऱ्या क्रकांकाचे क्षेत्र आहे. आतापर्यंत प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत ग्रामीण भागामध्ये १.७ दशलक्ष घरे बांधण्यात आलेली आहेत. या क्षेत्रामध्ये तब्बल ३५ दशलक्ष रोजगाराची निर्मिती झाली आहे.

७. संरक्षण उत्पादनः संरक्षण उत्पादन अंतर्गत देशामध्ये एअर मिसाइल सिस्टीम, धनुष आर्टिलरी गन सिस्टीम आणि हलके लढाऊ विमाने तयार करण्यात येत आहेत.

८. इलेक्ट्रिकल मशिनरी : भारत हा इलेक्ट्रिकल मशिनरीचा आयातक देश होता परंतु आता भारताने या क्षेत्रात उत्पादन वाढऊन भारत इलेक्ट्रिकल मशिनरीचा निर्यातक देश बनला आहे.

९. इलेक्ट्रानिक प्रणालीः इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी क्षेत्रात भारतातील प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक ४.४ पट वाएलेली आहे. २०११ ते २०१४ मध्ये या क्षेत्रातील विदेशी गुंतवणूक २.७७ अब्ज डॉलर होती ती २०१४ते २०१७ या दरम्यान १२.२४ अब्ज डॉलरपर्यंत वाढली आहे.

१०. अन्न प्रक्रिया :२०१४ते २०१८ या दरम्यान ६ मेगा फूडपार्कची स्थापना करण्यात आलेली आहे. ८३ शित प्रकल्प कार्यान्वित करण्यात आलेला आहे या प्रकल्पाची अन्न प्रक्रिया क्षमता ३.६ लाख टन इतकी आहे.

११.आयटी आणि बीपीएम : या क्षेत्रात विदेशी गुंतवणूकीच्या प्रवाहामध्ये मोठी वाढ झालेली आहे. हार्डवेअर क्षेत्रातील गुंतवणूक २.३ अब्ज डॉलरवरून ५.६ अब्ज डॉलर इतकी झाली आहे. या क्षेत्रात १७००० पेक्षाही अधिक कंपन्या कार्यरत आहेत.१००० मोठ्या कंपन्या ह्या वितरणाशी संबंधित आहेत.

१२. लेदरः

### ➢ मेक इन इंडिया अंतर्गत प्रमुख तरतुदी

मेक इन इंडिया अभियान यशस्वी करण्यासाठी अर्थव्यवस्थेच पुढील सुधारणाविषयक तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

१. प्रथमच रेल्वे, विमा, संरक्षण आणि वैद्याकीय उपकरणे ही क्षेत्र अधिक थेट विदेशी गुंतवणूकीसाठी खुली करण्यात आली आहेत.
२. स्वयंचलित मार्गाने संरक्षण क्षेत्रातील थेट विदेशी गुंतवणूकीची कमाल मर्यादा ४६टक्यांवरून ७४ टक्के करण्यात आली आहे.
३. बांधकाम आणि निर्दिष्ट रेल्वे पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये स्वयंचलित मार्गासाठी १० टक्के थेट विदेशी गुंतवणूकीला परवानगी देण्यात आलेली आहे.
४. एक इन्व्हेस्टर फॅसिलिटेशन सेल आहे, जो गुंतवणूकदारांना भारतात आल्यापासून ते देश सोडून जाण्यापर्यंत मदत कराते, गुंतवणूकीचा टप्पा, अंमलबजावणी आणि वितरण सेवा यासारख्यसा सर्व टप्प्यांमध्ये गुंतवणूकदारांना सेवा देण्यासाठी २०१४ मध्ये याची निर्मिती करण्यात आलेली आहे.
५. भारताच्या‘इज ऑफ डुइंग बिझनेस’ दर्जा सुधारण्यासाठी सरकारने पाऊले उचलली आहेत. भारत २०१६ मध्ये व्यव्साय सुलभतेच्या निर्देशांकात २३ गुणांनी ७७ व्या स्थानावर पोहचला, भारताने या निर्देशांकात दक्षिण आशियामध्ये सर्वोच्च स्थान मिळविला.
६. श्रम सुविधा पोर्टल, eBiz पोर्टल इत्यादी सुरू करण्यात आले आहेत. eBiz पोर्टल भारतात व्यव्साय सुय करण्याशी संबंधित अकरा सरकारी सेंवांसाठी सिंगल-विंडो प्रवेश देते.

➢ मेक इन इंडिया अभियानाची उपलब्धी

मेक इन इंडिया अभियानाला ८ वर्ष पूर्ण झालेली आहेत. या ८ वर्षामध्ये प्राध्यान्यक्रम असलेल्या अनेक उद्योगांमधे लक्षणिय प्रगती झालेली आहे.

१. विदेशी गुंतवणूक : २०१४-१५ मध्ये भारतामध्ये विदेशी प्रत्यख गुंतवणूक १४.१५ अब्ज डॉलर होती ती वाढून २०२१-२२ मध्ये ८३.६ अरब डॉलर झाली. जगातिल १०१ देशांनी भारताच्या ३१ राज्य आणि केंद्रशासीत प्रदेशातील ५७ वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये गुंतवणूक केली आहे.
२. भारतीय वस्त्रोद्योग हा जगातील सर्वात मोठ्या उद्योगापैंकी एक आहे. २०२० मध्ये स्थापन झालेल्या राष्ट्रीय तांत्रिक वस्त्रोद्योग अभियांतर्गत भारताची २०७ तांत्रिक वस्त्रोद्योग उत्पादनाची निर्या २०२०-२१ मध्ये USD 2.21 bn वरून २०२१-२२ मध्ये USD 2.85 bn झाली आहे, २८.४ वाढीचा दर नोंदविला आहे.
३. देशातील पहिली टॅक्टर निर्माता कंपनी‘सेलेस्टियल ई.मोबिलिटी मेक्सिकन’ कंपनीने इलेक्िअ्रक टॅक्टर्स तयार केले असून या ट्रॅक्टर्स मेक्सिकन बाजारात विकल्या जाणार आहे. ही मेक इन इंडियाची मोठी उपलब्धी आहे.

➢ **मेक इन इंडिया अभियानाला पाठबळ देणाऱ्या योजना**

मेक इन इंडिया अभियान यशस्वी करण्यासाठी आणि मेक इन इंडियाला पाठबळ देण्यासाठी देशामध्ये पुढील योजना सुरू केलेल्या आहेत.

१. स्किल इंडिया मिशन : भारतीय नौकरदारांमध्ये कौशल्य निर्माण करण्यासाठी दरवर्षी विविध क्षेत्रामध्ये १० दशलक्ष कौशल्य निर्माण करण्याचे उद्दिष्ट स्किल इंडिया मिशनमध्ये निश्चित करण्यात आलेले आहे. याकरीता विविध कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्याचे निश्चित केले आहे.
२. स्टार्टअप इंडिया : स्टार्टअप इंडिया योजना २०१६ मध्ये सुरू करण्यात आलेली आहे. हा भारत सरकारचा उपक्रम असून या योजनेचा मुख्या उद्देश स्टार्टअपला प्रोत्साहन देणे, रोजगार निर्मिती आणि संपत्ती निर्माण करणे हा आहे.

३. डिजीटल इंडिया : ३ जुलै २०१५ रोजी डिजीटल इंडिया कार्यक्रम सुरू करण्यात आलेला आहे. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश देशातील प्रत्येक नागरीकांना डिजीटली सक्षम बनवण्याच्या दृष्टीने कागदोपत्री कामे काढून नागरीकांना इलेक्ट्रॉनिक पध्दतीने सरकारी सेवांचा लाभ देणे हा आहे.
४. प्रधानमंत्री जन धन योजना : प्रधानमंत्री जन धन योजना हे आर्थिक समावेशनाचं राष्ट्रीय अभियान आहे. याअंतर्गत बँकिंग/बचत आणि ठेवी टपालाने रक्कम पाठविण्याची सोय, क्रेडिट/पतपुरवठा, वीमा, निवृत्तीवेतन या आणि अशा वित्तीय सेवा परवडणाऱ्या दरात उपलब्ध व्हाव्यात याची सुनिश्चिती केली जाते.
५. स्मार्ट सिटी मिशन : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २५ जून २०१५ रोजी भारतात स्मार्ट सिटी मिशन लॉच केले. स्मार्ट सिटी मिशन हा भारत सरकारचा सर्वोत्तम पध्दती, माहिती आणि डिजीटल तंत्रज्ञान, सार्वजनिक-खाजगी भागीदारी वापरून भारतात राहणाऱ्या लोकांचे जीवनमान सुधारणे आणि आर्थिक विकासाला चालना देणे हे या मिशनचे महत्वाचे उद्दिष्ट आहे. या मिशन अंतर्गत प्रायोगित तत्वावर भारतातील १०० शहरांची स्मार्ट सिटी म्हणून निवड करण्यात आलेली आहे.

➢ **मेक इन इंडिया अभियानासमोरील आव्हाने**

भारतामध्ये स्वातंत्र्योत्तर काळानंतर कृषीवर अवलंबून असलेल्या लोकसंख्येचे प्रमाण कमी कमी होत असले तरीसुध्दा एकूण लोकसंख्येचा विचार करता ५० टक्कयांपेक्षाही जास्त लोकसंख्या कृषीवर अवलंबून आहे. विकसित देशात हे प्रमाण बरेच कमी आहे. भारताच्या चांगल्या भविष्यासाठी भारतामध्ये विकासामध्ये समतोल साधुन या स्थितीमध्ये बदल होणे गरजेचे आहे.

१. मेक इन इंडियाच्या मार्गातील सर्वात मोठे आव्हाण हे अपुऱ्या सोयीसुविधांचे ठरणार आहे. मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाला चालना देण्यासाठी व उत्पादन बाजारपेठेपर्यंत पोहचविण्यासाठी रस्ते, रेल्वे वाहतूक, भारतातील अपुरी बंदरे, इत्यादी पुरेशा सुविधांचा अभाव, उर्जा निर्मितीची कमतरता ही गुंतवणूकदारांसाठी चिंतेची बाब ठरू शकते.
२. मेक इन इंडिया अभियान यशस्वी ठरण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार यांच्यातील असमन्वय, केंद्र व राज्य सरकारची वेगवेगळी धोरणे गुंतवणूकीसाठी अडथळा ठरू शकते.
३. भारतातील प्रचलित सरकारच्या कार्यकाळात भष्ट्राचाराचे झालेले आरोप आणि त्यामुळे भारताची जागतिक स्तरावर निर्माण झालेली छबी गुंतवणूकदारांना भारतामध्ये आकर्षीत करण्यासाठी अडचणीचे ठरू शकते.

**निष्कर्ष**

भारत हा एक विकसनशील देश आहे. या देशात ग्रामीण भागामध्ये राहणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण ७० टक्यांपेक्षाही अधिक आहे. यातील बहुतांश लोकांची उपजिविका कृषीवर अवलंबून आहे. परंतु केवळ कृषीवर अवलंबून राहुन देशाला आत्मनिर्भर बनविता येणार नाही. वाढती लोकसंख्या, वाढती बेरोजगारी यावर मात करावयाची असेल तर रोजगाराच्या नविन संधी निर्माण कराव्या लागतील. यासाठी मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मेक इन इंडियाचा नारा दिला हा नारा बुलंद करण्यासाठी देशातील पायाभूत सोयीसुविधा क्षेत्रातील सुधारणा झपाट्याने कराव्या लागतील. आर्थिक सुधारणा, कालबाह्य कामगार कायदे, बँकिंग व प्रशासकीय सुधारणा, उद्योग क्षेत्रातील कालबाह्य तंत्रज्ञान यासाठी सरकारला नियोजनबध्द कार्यक्रम हाती घेणे गरजेचे आहे. भारतामध्ये काही राज्य विकासाच्या बाबतीत अजुनही बरेचसे मागासलेले आहेत त्यामुळे राजकीय मतभेद बाजुला सारून मेक इन इंडिया अभियान खरोखरच प्रत्यक्षात उतरविण्यासाठी सर्व राज्यांना समान भागीदारी निश्चित करून राज्यांना सोबत घ्यावे लागेल. केंद्राच्या सहकार्याने राज्य सरकारनी राज्यातील मेक

इन इंडियाचे प्राध्यान्यक्रम क्षेत्र असलेल्या उद्योगांमध्ये गुंतवणूक वाढविण्यासाठी गुंतवणूक मेळावे आयोजित केले पाहिजे.

**संदर्भ ग्रंथसुची**

१. मेक इन इंडिया, विकसित भारत की और बढते कदम : प्रो. टि. वी. कटटीमणी, इ.गा. राष्ट्रीय जनजाती विश्वविद्यालय, अमरकंटक-२०१६

२. महायोजना : ६ मार्च २०२३

३. Make In India : A Persuasive Thought, Dr. Abhishekah Shrivastav, Dr. Mukta Goyal, Walnut Publication

४. Make In India: Initiatives And Challenges, M.K.Singh, R. Ranjan, Prashant Publishing House,

५. Make In India : A Road Map, Dr. Dharen Pandey,Dr. Brajesh Tiwari, Global Vision Publishing House

६. India Rising : J.M.Rampal, Atlantic Publishers 7 Distribution Pvt. Ltd.

७. REFERENCE NOTE, MEMBERS REFERENCE SERVICE LARRDIS, LOK SABHA SECRETARIAT NEW DELHI, March 2020

❑❑❑